## निवडक

### निसर्गाचा समतोल राखण्यासाठी ‘माझी वसुंधरा अभियान’

#### वृक्ष लावूया आणि वाढवू या - पालकमंत्री बाळासाहेब पाटील यांचे आवाहन

**सातारा, दि. ६ ( वार्ताहर ) :** वृक्ष तोडीमुळे निसर्गाचा समोतल बिघडत चाललेला आहे. त्याचे परिणाम आज दिसत आहेत. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सर्व नागरिकांनी ‘माझी वसुंधरा‘ या अभियानात सक्रीय सहभाग घेवून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करुन त्यांचे संवर्धन केले पाहिजे, असे आवाहन पालकमंत्री बाळासाहेब पाटील यांनी आज केले. पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी शासनाने माझी वसुंधरा अभियान राज्यात राबविण्यास सुरुवात केली आहे. या अभियानांतर्गत रहिमतपूर नगर परिषदेने रहिमतपूर येथील गांधी मैदानावर माझी वसुंधरा अभियान, स्वच्छ सर्वेक्षण २०२१ अंतर्गत हरित सायकल महारॅलीचे आयोजन केले होते. या रॅलीला हिरवा झेंडा दाखवून पालकमंत्री श्री. पाटील यांनी मार्गस्थ केले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी नगराध्यक्ष आनंदा कोरे, तहसीलदार अमोल कदम, मुख्याधिकारी संजीवनी दळवी, उपनगराध्यक्षा सुरेखा माने, सुनिल माने, चित्रलेखा माने-कदम आदी उपस्थित होते. पृथ्वीचे आयुष्यमान वाढविण्यासाठी प्रत्येकाने वृक्ष लागवड केली पाहिजे तसचे वृक्ष तोड थांबवली पाहिजे, असे आवाहन करुन पालकमंत्री श्री.पाटील पुढे म्हणाले, बेसुमार वृक्ष तोडीमुळे आज आपण निसर्ग निर्मित अनेक संकटांना सामोरे जात आहे. यापुढे प्रत्येकाने वृक्ष लागवडीसाठी पुढाकार घेतला पाहिजे. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी प्लास्टीकचा वापरही करु नये. कोरोना संसर्गाचे संकट काही प्रमाणात दूर झाले असले तरी नागरिकांनी मास्क, सुरक्षित अंतर व वेळोवेळी हाताची स्वच्छता केली पाहिजे. रहिमतपूर नगर परिषदेने पर्यावरणाच्या संरक्षणासाठी हरित सायकल महारॅली काढली या रॅलीला त्यांनी शेवटी शुभेच्छा दिल्या. पर्यावरणाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी हरित सायकल महारॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. यातून वृक्ष लागवड व संवर्धन याबाबचे नागरिकांना महत्व पटवून देण्यात येणार असल्याचे रहिमतपूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष आंनदा कोरे यांनी प्रास्ताविकात सांगितले. यावेळी सुनिल माने, चित्रलेखा माने- कदम यांनी माझी वसुंधरा अभियान व स्वच्छ सर्वेक्षण २०२१ अंतर्गत काढण्यात आलेल्या हरित सायकल महारॅलीला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थितांना हरित शपथ देण्यात आली. या कार्यक्रमास नागरिक, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

### औरंगाबादेत मराठा समाजाच्या प्रश्नांसाठी ठिय्या आंदोलन

औरंगाबाद, दि. ६ (वार्ताहर) : मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी शहरातील क्रांतीचौक भागात ठिय्या आंदोलन करण्यात आले. आरक्षणाच्या मागणीसह, नोकर भरती, कोपर्डीच्या घटनेतील आरोपींना फाशीच्या शिक्षा द्या यासह अन्य मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. यावेळी रास्ता रोको करण्याचा प्रयत्न करणाऱ्या मराठा आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. मराठा समाजाच्या विविध मागण्यांचे फलक हातात घेऊन मराठा क्रांती ठोक मोर्चाचे आंदोलक आणि युवकांनी क्रांतीचौक भागात मोर्चा काढत चौकाला प्रदक्षिणा मारली. हातात फलक घेऊन राज्य सरकारविरोधी घोषणाबाजीही यावेळी करण्यात आली. न्यायालयात या प्रकरणावर सुनावणी होत आहे. तिथे न्याय मिळेलच, मात्र सरकारच्या हातात असलेल्या गोष्टी त्यांनी करायला हव्या. मात्र तसे होत नसल्याने, युवकांचा रोष वाढल्याचे मत आंदोलक मराठा युवकांनी व्यक्त केलं.

न्यायालयाच्या आदेशाने मराठा आरक्षणाला स्थगिती मिळाली आहे. मात्र विशेष बाब म्हणून सरकार मराठा युवकांना नोकर भरतीत सामावून घेऊ शकते. मात्र तसे न करता काही विभागांची सरळ नोकर भरती प्रक्रिया राबविली जात आहे. त्यामुळे मराठा समाजात सरकारविरोधात रोष निर्माण झाला आहे. मराठा समाजाचे आमदार-खासदार समाजाचे प्रश्न मार्गी लावण्याऐवजी बघ्याची भूमिका घेत आहे. त्यामुळे त्यांचा निषेध करत असल्याचे आंदोलक युवकांनी सांगितले.

### कृषी कायद्याच्या निषेधार्थ सांगली -इस्लामपूर मार्गावर चक्काजाम

**सांगली, दि. ६ ( वार्ताहर ) :** केंद्राच्या कृषी कायदा विरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली विविध सामाजिक संघटनांकडून रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. सांगली-इस्लामपूर मार्ग यावेळी रोखून धरण्यात आला. परिणामी या मार्गावरील वाहतूक काही वेळ ठप्प झाली होती. दिल्लीमध्ये कृषी कायद्या विरोधात गेल्या काही महिन्यांपासून शेतकऱ्याचे आंदोलन सुरू आहे. या पार्श्वभूमीवर देशात रास्ता रोको आंदोलन पुकारण्यात आले आहे. सांगली जिल्ह्यातील विविध शेतकरी व सामाजिक संघटनांनी एकत्रित येऊन रस्ता रोको आंदोलन केले. लक्ष्मी फाटा याठिकाणी करण्यात आलेल्या या रस्ता रोकोमुळे या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. त्यामुळे दोन्ही बाजूला वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. या रस्ता रोको वेळी भाजप सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

पान ३ वरून

### ‘तोपर्यंत घरी परतणार नाही’

किसान आंदोलकांनी आज संपुर्ण देशभर दुपारी १२ ते ३ यावेळेत चक्काजाम आंदोलन करण्याची घोषणा केली होती. त्याला देशभरातून मोठा प्रतिसाद मिळाल्याची माहितीही त्यांनी दिली. उस गाळपाचा हंगाम सुरू असल्याने उत्तरप्रदेश, उत्तराखंड या राज्यांना या आंदोलनातून वगळण्यात आले होते. तथापि देशाच्या अन्य भागात या आंदोलनाला चांगला प्रतिसाद लाभला.

### राज ठाकरेंनी सचिन तेंडुलकर, लता मंगेशकरांच्या ‘ट्विट’वर सोडलं मौन

सचिन तेंडुलकर ही भारतरत्नं आहेत. खूप मोठी माणसं आहेत. त्यांना अशा गोष्टी करायला सांगणंष्ठ ती साधी माणसं आहेत. सरकारनं त्यांना सांगितलं, त्यांनी ट्विट केलं, पण आज जे ट्रोल होतंय आज त्यांच्यावरच येतंय,’ असं म्हणत राज ठाकरे यांनी सरकारला फटकारलं.

# त्याग, समर्पण, सेवाभावामुळेच समाज जिवंत राहतो : राज्यपाल भगतसिंह कोश्यारी

**मुंबई, दि. ६ ( प्रतिनिधी ) :** संकट प्रसंगी इतर देशात लोक सरकारवर विसंबून राहतात. भारतात मात्र जनसामान्य लोक आपापसातील मतभेद विसरून नि:स्वार्थ सेवेसाठी तत्पर होतात. त्यामुळेच कोरोनासारखे संकट येऊन जगभर हाहाकार झाला तरीही भारताने त्यावर सफलतेने मात केली.

भविष्यातही कोरोनासारखी संकटे येतील आणि जातील. मात्र जोवर देशात त्याग, समर्पण व सेवेची भावना आहे, तोवर भारतीय समाज जीवंत राहील, असे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले.

ठाणे येथील संस्कार सेवाभावी संस्थेद्वारे राजभवन येथे कोरोना योद्ध्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी राज्यपाल बोलत होते.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते सेवाभावी संस्था, पोलीस अधिकारी व कर्मचारी यांसह विविध क्षेत्रातील ३० कोरोना योद्ध्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला संस्कार सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष आमदार संजय केळकर तसेच महाराष्ट्र हाउसिंग फेडरेशनचे अध्यक्ष सीताराम राणे उपस्थित होते.



भारतात विविध धर्मांचे लोक एकत्र राहतात. परंतु सर्वच लोक सुसंस्कारित आहेत. प्रत्येक व्यक्तीमध्ये भगवंत मानून सेवा करण्याची अद्भुत भावना येथील लोकांमध्ये आहे.

समाज संकटात असताना समाजसेवेत आपले देखील योगदान असावे अशी भावना येथे गरिबातील गरीब व्यक्तीमध्ये आहे.

त्यामुळे आपल्या देशात कोरोना योद्ध्यांनी समर्पण भावनेने काम केले, असे राज्यपालांनी सांगितले.

यावेळी माहेश्वरी मंडळ, ठाणे (सुनिल जाजु), श्री ऋषभदेवजी महाराज जैन धर्म मंदीर व न्याती ट्रस्ट ठाणे (उत्तम सोळंकी), गौरव सेवा प्रतिष्ठान संस्था (डॉ.राजेश माधवी), जैन सामाजिक संस्था (पंकज जैन), रामराव माधवराव सोमवंशी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक ठाणे मधूकर शिवाजी कड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक ठाणे वंदना खैरे, महिला पोलीस शिपाई राहुल छगन वाघ, पोलीस शिपाई, भिवंडी सुनिल गोविंदलाल काबरा, विद्याधर अच्युत वैशंपायन, सुनेश रामचंद्र जोशी, नगरसेवक वैभव एकनाथ बिरवटकर, पत्रकार दिपक अनिल कुरकुंडे, पत्रकार अक्षय श्यामसुंदर भाटकर, पत्रकार गजानन वासुदेव हरिमकर, गणेश हरशिचंद्र थोरात, सुमन मोहनलाल नरशाना, डॉ.सुहेल अहमेद लंबाते, डॉ.धनश्री परशुराम देशमुख, डॉ.राणी रामराव शिंदे, केतकी अभय पावगी, मयुरी संजय पटवर्धन, लक्ष्मण सुकीर सारदेकर, पांडुरंग काशिनाथ गिजे, रवींद्र सत्यनारायण रेडडी, धनंजय रामलोचन सिंग, देवेंदरजीत कौर, महेश आत्माराम विनेरकर, रोनाल्ड अंथनी आईसक, अरिफ मोहिदीन बडगुजर यांचा राज्यपालांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

## उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रांनी एकत्रित येऊन रोजगार निर्मितीवर भर द्यावा - सुभाष देसाई

**पुणे, दि. ६ ( वार्ताहर ) :** उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रांनी एकत्रित येऊन रोजगार निर्मितीवर भर द्यावा, असे आवाहन उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी केले. किवळे येथील सिम्बॉयोसिस कौशल्य व व्यावसायिक विद्यापीठाचा प्रथम पदवीदान समारंभ उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी विद्यापीठाचे कुलपती डॉ. शां.ब. मुजुमदार, प्रभारी कुलपती डॉ. स्वाती मुजुमदार, कुलगुरु डॉ. अश्विनी कुमार शर्मा, फियाटचे अध्यक्ष रवी गोगिया, उद्योग, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तसेच विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी उपस्थित होते. उद्योगमंत्री श्री.देसाई म्हणाले, सिम्बॉयोसिस कौशल्य व व्यावसायिक विद्यापीठ हे राज्यातील पहिले कौशल्य विद्यापीठ आहे. याचा महाराष्ट्राला अभिमान आहे. कौशल्य विकासासाठी विद्यापीठाची प्रतिबद्धता आणि येथे उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधांचे त्यांनी कौतुक केले. कौशल्य आधारित शिक्षणात विद्यापीठ देशासाठी एक आदर्श आहे. सिम्बॉयोसिस विद्यापीठाने कौशल्य विकास केंद्र स्थापनेबाबत मार्गदर्शन करावे, असे सांगून शैक्षणिक संस्थांनी उद्योगांशी अशा प्रकारे एकत्रित येवून रोजगार उपलब्धी वाढविणाऱ्या उपक्रमासाठी पुढाकार घेतल्याबद्दल विद्यापीठाचे कौतुक केले. अशाप्रकारे इतर संस्थानी सुध्दा रोजगार उपलब्धीबाबत पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

## बांधकामाधीन सिंचन प्रकल्प निर्धारित कालावधीत पूर्ण करा : जयंत पाटील

**वाशिम, दि. ६ ( वार्ताहर ) :** जिल्ह्यात बळीराजा जलसंजीवनी योजना व अनुशेष अंतर्गत बांधकामाधीन असलेले १६ लघु पाटबंधारे प्रकल्प निर्धारित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री जयंत पाटील यांनी दिल्या. तसेच जिल्ह्यातील सिंचन क्षमता वाढीसाठी शासन प्रयत्नशील राहील, असे सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयातील वाकाटक सभागृहात आज झालेल्या वाशिम जिल्हा जलसंपदा विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, आमदार ॲड. किरणराव सरनाईक, आमदार अमित झनक, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता आशिष देवगडे, अधीक्षक अभियंता एम. के. तायडे, कार्यकारी अभियंता प्रशांत बोरसे, श्री. चौधरी, शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेश मापारी यांची प्रमुख उपस्थिती होती. श्री.पाटील म्हणाले, अडाण नदीवर घोटाशिवणी, सत्तरसावंगा व बोरव्हा येथे बॅरेज निर्मितीचा प्रस्ताव आहे. या बॅरेजला सुधारित प्रशासकीय मान्यता आवश्यक असल्याने हा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळासमोर सादर केला जाणार आहे. पैनगंगा नदीवर ६ बॅरेज उभारणीची मागणी आहे. या नदीवरील कळमगव्हाण प्रकल्प रद्द झाला आहे. कळमगव्हाण प्रकल्पासाठी मंजूर असलेले पाणी मसलापेन येथे उभारण्यात येणाऱ्या नवीन बॅरेजसाठी वापरण्यासाठीचा प्रस्ताव सादर करावा. त्यामुळे पैनगंगा नदीवरील एका बॅरेजचा प्रश्न मार्गी लागेल, उर्वरित ५ बॅरेजच्या अनुषंगाने तांत्रिकदृष्ट्या चाचपणी करावी.

सोनल मध्यम प्रकल्पाच्या पाण्याचे वितरण योग्य रीतीने होवून त्या पाण्याचा सिंचनासाठी वापर होणे आवश्यक आहे.

त्यामुळे या प्रकल्पाच्या कालव्याच्या दुरुस्तीची आवश्यकता असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळामार्फत शासनाला सादर करावा. तसेच पळसखेड प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील काही झाडे, विहिरी व घरांचा मोबदला देण्याची कार्यवाही प्रलंबित आहे. याबाबतचा प्रस्तावही तातडीने नियामक मंडळापुढे सादर करावा. मालेगाव तालुक्यातील पांगराबंदी प्रकल्पाचे साडेपाच किलोमीटरचे कालवे रद्द करून उपसा सिंचन वाढविण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.

# न्याय व्यवस्थेच्या बाबतीत महाराष्ट्र देशात अव्वल

**मुंबई, दि. ६ ( प्रतिनिधी ) :** संपूर्ण भारताचा अभ्यास केल्यास महाराष्ट्र हे देशातील असं राज्य आहे, जिथं न्याय सर्वात चांगल्या पद्धतीनं आणि लवकर मिळतो. छोट्या राज्यांच्या बाबतीत हा मान त्रिपुरानं पटकावला आहे. टाटा ट्रस्टनं राज्यांद्वारे आपल्या नागरिकांना दिल्या जाणाऱ्या न्यायाच्या क्षमतेचा अभ्यास करत इंडिया जस्टिस रिपोर्ट २०२० प्रसिद्ध केला आहे. इंडिया जस्टिस रिपोर्ट २०२० मध्ये न्याय प्रक्रियेचे ४ प्रमुख अंग असलेल्या पोलीस, न्यायालय, तुरूंग आणि कायदेशीर मदतीच्या आधारावर राज्यांची रँकींग केली गेली आहे.

या रँकींगनुसार, भारतात सर्वाधिक सहज आणि सोपी न्याय प्रणाली महाराष्ट्रात आहे. कौतुकास्पद बाब ही आहे, की २०१९मध्येही महाराष्ट्र या यादीत अव्वल होता आणि यंदाही अव्वलच आहे. जर आपण वेगवेगळ्या मानकांवर चर्चा केली, तर कायदेशीर मदत पुरविण्यात महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. त्याचबरोबर, तामिळनाडू न्यायव्यवस्थेच्या सोयीसाठी पहिल्या क्रमांकावर आहे. नागरिकांना पोलीस सेवा पुरविण्यात कर्नाटक प्रथम क्रमांकावर आहे. तर, उत्तम कारागृह सुविधेच्या बाबतीत राजस्थान पहिल्या क्रमांकावर आहे. सर्वसमावेशक समाज आणि गतिमान लोकशाही घडण्याच्या दिशेने या मानकांचे महत्त्व समजून घेत सेवानिवृत्त सरन्यायाधीश मदन बी. लोकूर म्हणाले की, न्यायालयीन यंत्रणेने कमकुवत नागरिकांच्या हक्कांसाठी आवाज उठविला पाहिजे आणि सर्व कार्यपद्धती अशा असाव्यात की नागरिकांना न्याय मिळावा. तुरूंगातील सुधारणांवर जोर देताना न्यायमूर्ती लोकुर यांनी या अहवालाच्या प्रस्तावनेत असं लिहिलं आहे, की कैद्यांना तुरूंगात ठेवण्याऐवजी त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे आणि त्यांना कायदेशीर मदत व सेवा अत्यंत सहज उपलब्ध करून दिल्या पाहिजे.

**तेलंगणाची कौतुकास्पद झेप -**

महाराष्ट्रापाठोपाठ या रँकींगमध्ये तमिळनाडू, तेलंगणा, पंजाब आणि केरळ ही राज्यं दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या क्रमांकावर आहेत. या रँकीगमध्ये तेलंगणानं मोठी झेप घेतली आहे. मागील वर्षी म्हणजेच २०१९ ला तेलंगणा या यादीत ११ व्या स्थानी होतं. मात्र, यंदा या राज्यानं तिसरा क्रमांक पटकवला आहे.

**उत्तर प्रदेश, बंगाल आणि मध्यप्रदेशसारख्या राज्यात आभाव -**

या रँकींगमध्ये उत्तर प्रदेश मागील वर्षीप्रमाणे यंदाही सर्वात खाली म्हणजेच १८ व्या क्रमांकावर आहे. ही रँकींग १८ मोठ्या आणि लहान राज्यांसाठी केली गेली आहे. उत्तरप्रदेशला १० पैकी ३.१५ इतका मार्क मिळाला आहे, तर महाराष्ट्राला ५.७७ मार्क मिळाले असून राज्यानं अव्वल स्थान पटकावलं आहे. २०१९ मध्ये बंगाल या यादीत १२ व्या नंबरवर होतं. मात्र, यंदा बंगाल १७ व्या स्थानी गेलं आहे. मध्यप्रदेशदेखील मागील वर्षी ९ व्या स्थानावर होतं. मात्र, यंदा ते १६ व्या स्थानावर आलं आहे.

या अहवालात असं म्हटलं आहे, की येत्या काळात न्यायालयीन यंत्रणेची भूमिका खूप महत्वाची ठरणार आहे. अहवालात असे नमूद केलं आहे, की वाढती उत्पन्न असमानता, दुर्मिळ संसाधनांसाठी एकमेकांशी स्पर्धा करणे, सामाजिक ऐक्य बिघडणे, नागरी सहभागासाठी आवश्यक संधी न मिळणे, विविध समुदायांमधील अधिकाराचे असंतुलन यामुळे निष्पक्ष न्याय व्यवस्थेची न्याय प्रणालीची मागणी जोर धरेल.

## कंगनाच्या विरोधातील तपास अहवाल सादर करा

**मुंबई, दि. ६ ( प्रतिनिधी ) :** सोशल मीडियावर भडकाऊ पोस्ट लिहिल्याचा आरोप कंगना रणौतवर आहे. याबात सुरू असलेल्या तपासाचा प्रगती अहवाल न्यायालयाने मागितला आहे.

मुंबईच्या मॅजिस्ट्रेट कोर्टाने शुक्रवारी पोलिसांना तपास अहवाल सादर करण्याचा आदेश दिला आहे. गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात एका वकिलाच्या तक्रारीवरुन कोर्टाने कंगनाचा तपास करण्याचा आणि ५ डिसेंबरपर्यंत अहवाल सादर करण्याचा आदेश पोलिसांना दिला होता. पोलीस ठरलेल्या मुदतीत अहवाल दाखल करू शकले नाहीत. त्यानंतर कोर्टाने अंतिम मुदत ५ जानेवारीपर्यंत वाढविली. यानंतर कोर्टाने पुन्हा एकदा ५ फेब्रुवारीपर्यंत मुदत दिली, परंतु अद्यापही पोलीस अहवाल सादर करण्यात अपयशी ठरले आहेत.

कंगना रणौतच्याविरोधात तक्रार दाखल करणारे वकील अली आसिफ खान देशमुख म्हणाले की, ‘अनेक वेळा मुदत वाढवूनही पोलीस तक्रार नोंदविण्यात अपयशी ठरले आहेत. मी कोर्टाला आरोपीविरोधात थेट कारवाई करण्यास सांगितले होते. अशा परिस्थितीत पोलिसांकडे कोर्टाने आता तपासाचा प्रगती अहवाल मागितला आहे. सध्या सीआरपीसीच्या कलम २०२ अन्वये कंगना रणौतच्याविरूद्ध चौकशी सुरू आहे. त्याअंतर्गत कोर्टाने पोलिसांना या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले असून कंगनाच्या विरोधात प्राथमिक प्रकरण दाखल आहे की नाही हे सांगावे असे आदेश दिले आहेत.

कोर्टाने पुढील सुनावणीसाठी ४ मार्चची मुदत दिली आहे. गेल्या वर्षी एप्रिलमध्ये कंगना रणौतची बहीण रांगोली चंदेल हिने एका समुदायाला लक्ष्य केले होते. त्यानंतर टिवटरवर तिचे अकाउंटही निलंबित करण्यात आले होते.

कंगना रणौतने या पोस्टला पाठिंबा दर्शविणारा एक व्हिडिओ प्रसिद्ध केला आहे. या व्हिडिओमध्ये कंगनाने एका विशिष्ट समुदायाला दहशतवादी म्हटले आहे. याबाबत तक्रार देत असिफ खान देशमुख यांनी कोर्टाकडे मागणी केली होती की, पोलिसांनी दोघींविरोधात चौकशी करावी आणि कारवाई केली पाहिजे.

# डिजिटल पेमेंट, बँकिंग आणि फायनान्स कंपन्यांच्या तक्रारींसाठी एकच नंबर

## आरबीआयची घोषणा

**मुंबई, दि. ६ ( प्रतिनिधी ) :** डिजिटल पेमेंट सर्व्हिसेस बळकट करण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया २४ तासांचा हेल्पलाईन नंबर सुरु करणार आहे. आरबीआयने म्हटलं की, सप्टेंबर २०२१ पर्यंत देशभरात एक केंद्रीकृत हेल्पलाईन नंबर आणला जाईल. जेणेकरुन ग्राहकांना विविध डिजिटल पेमेंट प्रोडक्टची माहिती मिळू शकेल आणि त्यांच्या तक्रारी नोंदवता येतील. वन नेशन, वन लोकपाल योजनेंतर्गत या हेल्पलाईनवर डिजिटल पेमेंट करणाऱ्या ग्राहकांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळू शकतील. डिजिटल पेमेंट, बँकिंग आणि फायनान्स कंपन्यांशी संबंधित काही तक्रारी असल्यास, या क्रमांकावर नोंदणी करता येईल. शुक्रवारी आर्थिक धोरण जाहीर करताना आरबीआयने ही माहिती दिली. आरबीआयच्या म्हणण्यानुसार, तक्रारींचे निवारण करण्यासाठी सध्या बँकिंग, नॉनबँकिंग फायनान्स कंपन्या आणि डिजिटल व्यवहारात तीन वेगवेगळे लोकपाल तयार करण्याची योजना आहे. आता या तिघांसह एक राष्ट्र, एक लोकपाल यंत्रणा कार्यान्वित होईल. या उपक्रमाचे उद्दिष्ट म्हणजे ग्राहकांना तक्रारींच्या निराकरणासाठी एकच व्यवस्था देणे. त्याअंतर्गत आरबीआय जून २०२१ पर्यंत एकात्मिक योजना आणण्याची शक्यता आहे. याद्वारे, ग्राहकांना तक्रारीसाठी वेगवेगळी नाही तर एकच व्यवस्था प्राप्त होणार आहे. आरबीआयच्या म्हणण्यानुसार, ऑथराइज्ड पेमेंट सिस्टम्सचे ऑपरेटर आणि पार्टिसिपेंटस यांच्यावतीने प्रदान केलेली उत्पादने विविध प्रकारच्या ॲक्टिविटी करतात. बऱ्याचदा हे उपक्रम आउटसोर्स केले जातात. कार्यक्षमता वाढवणे आणि खर्च कमी करणे हा यामागील हेतू आहे. तथापि, अशा आऊटसोर्स सेवा प्रदान करणाऱ्यांसाठी सिस्टमचा धोका देखील वाढतो. यामुळे सायबर सुरक्षेचा धोका वाढतो. हा धोका लक्षात घेता आरबीआय मार्गदर्शक तत्त्वे जारी करणार आहे. डिजिटल पेमेंट सेवा बळकट करण्यासाठी आधीच घेतलेल्या उपाययोजनांचा हा एक भाग म्हणून आरबीआयचे हे पाऊल टाकले आहे.

## पृथ्वीराज चव्हाण यांच्या पत्नीला पोलिसांनी घेतलं ताब्यात

**कराड, दि. ६ ( वार्ताहर ) :** केंद्र सरकारच्या कृषी कायद्यांविरोधात मागच्या अडीच महिन्यांपासून दिल्लीच्या सीमेवर शेतकऱ्यांचं आंदोलन सुरू आहे.

या आंदोलनाला पाठिंबा म्हणून आज देशभरात विरोधकांकडून चक्काजाम आंदोलन सुरू आहे.

कराडमध्ये माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या पत्नी सत्वशिला चव्हाण यादेखील आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. यावेळी त्यांनी माध्यमांशी बोलताना केंद्र सरकार व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेवर टीका केली.

‘आज शेतकरी रस्तावर उतरला असताना पंतप्रधान आणि अधिकारी वातानुकुलीत कार्यालयात बसून शेतकरी यांची चेष्टा करत आहेत. जर देशाचा पंतप्रधान शेतकरी असते तर त्यांना शेतकरी यांची बाजू पटली असती. पंतप्रधान मोदींना शेतातील काय कळते?’ असा सवाल सत्वशिला चव्हाण यांनी विचारला.

कराडमधल्या या चक्काजाम आंदोलनाच्या ठिकाणी मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता.

यावेळी पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतलं, यामध्ये सत्वशिला चव्हाण यांचाही समावेश होता.

## भूजल बचतीच्या उपाययोजना राबविण्याची गरज - डॉ.संजय चहांदे

**मुंबई, दि. ६ ( प्रतिनिधी ) :** भूजल पुनर्भरणाच्या योजनांसोबतच भूजल बचतीच्या उपाययोजना राबविणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.संजय चहांदे यांनी केले. केंद्रीय भूमिजल मंडळाद्वारे नॅशनल अक्वीफर मॅपींग या प्रकल्पातंर्गत राज्यातील जलधारकांचे नकाशे तयार करण्याचे काम करण्यात येत आहे. या प्रकल्पाची बैठक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या पुणे येथील मुख्यालयी डॉ.संजय चहांदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या सहकार्याने केंद्रीय भूमिजल मंडळ, नागपूर यांचेद्वारे तयार करण्यात आलेल्या सातारा, सोलापूर, अहमदनगर, नंदूरबार, बीड, हिंगोली, नांदेड, परभणी, नागपूर, वर्धा या दहा जिल्ह्यांचे जलधारक नकाशे व जलधरांचे व्यवस्थापन आराखडे यांना मान्यता देण्यात आली. आजच्या परिस्थितीत ग्रामीण पाणीपुरवठा तसेच शेती मोठ्या प्रमाणावर भूजलावर अवलंबून आहे. त्यामुळे अनेक भागात भूजलाचा उपसा वाढून भूजल टंचाई निर्माण होत आहे. या अनुषंगाने भूजल उपलब्धतता वाढविण्याकरीता व टिकविण्याकरीता आवश्यक असलेल्या भूजल पुनर्भरणासाठी तसेच भूजल व्यवस्थापनासाठी राज्याची भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा त्याचबरोबर केंद्र शासनाचे केंद्रीय भूमिजल मंडळ, नागपूर समन्वयाने सतत कार्यरत आहे. जलधारकांच्या जलव्यवस्थापन आराखड्यात भूजलाची उपलब्धतता वाढविण्यासाठी भूजल पुनर्भरणाच्या उपाययोजनांसोबत भूजल बचतीच्या उपाययोजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. भूजल पुनर्भरणाच्या योजनांमुळे १० ते १२ टक्के पर्यत भूजल वाढू शकते.


RUTTONSHA

**रुट्टोन्शा इंटरनॅशनल रेक्टीफायर लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय :** १३९/१४१, सोलारिस १, बी-विंग, १ ला मजला, साकी विहार रोड, पवई, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०० ०७२.
दूर. क्र. : ०२२-२८४७१९५६ फॅक्स : ०२२-२८४७१९५९ ई-मेल : secretarial@ruttonsha.com
वेबसाइट : www.ruttonsha.com सीआयएन : L31109MH1969PLC014322

**सूचना**

सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन २९ सहवाचन विनियमन ४७ अंतर्गत याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, दि. ३१ डिसेंबर, २०२० (क्यू३) रोजी संपलेल्या तिमाही व नऊ महिने अखेरकरिता कंपनीच्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांवर विचारविनिमय करणे व त्यांना मान्यता देण्याकरिता कंपनीच्या संचालक मंडळाची सभा शुक्रवार, दि. १२ फेब्रुवारी, २०२१ रोजी आयोजित करण्यात येत आहे.
सदर माहिती कंपनीची वेबसाइट www.ruttonsha.com वर प्रसिद्ध केली आहे व तसेच स्टॉक एक्सचेंज वेबसाइट www.bseindia.com वर उपलब्ध आहे.

रुट्टोन्शा इंटरनॅशनल रेक्टीफायर लिमिटेड करिता
सही/-
भाविन पी. रामभिया
कंपनी सचिव

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०६ फेब्रुवारी, २०२१



**दलाल स्ट्रीट इनव्हेस्टमेंट्स लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय :** ३०१, चिंतामणी अपार्टमेंट, १४७८, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.
मुंबई कार्यालय : ६सी, सिंधू हाऊस, नानाभाई लेन, फ्लोरा फाऊंटन, फोर्ट, मुंबई ४०० ००१.
दूर. क्र. : +९१ २२ २२०२४५५५
ई-मेल आयडी : info@dalalstreetinvestments.com
सीआयएन : L65990PN1977PLC141282
वेबसाइट : www.dalalstreetinvestments.com

**सूचना**

सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ४७ अंतर्गत याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, दि. ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या ३ ऱ्या तिमाही व नऊमहिने अखेरकरिता कंपनीच्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांवर विचारविनिमय करणे व त्यांना मान्यता देण्याकरिता कंपनीच्या संचालक मंडळाची सभा शुक्रवार, दि. १२ फेब्रुवारी, २०२१ रोजी आयोजित करण्यात येत आहे. सदर सूचना कंपनीची वेबसाइट www.dalalstreetinvestments.com वर प्रसिद्ध केली आहे व तसेच स्टॉक एक्सचेंज वेबसाइट www.bseindia.com वर उपलब्ध आहे.

दलाल स्ट्रीट इनव्हेस्टमेंट्स लिमिटेडकरिता
व त्यांच्या मंडळाच्या वतीने
सही/-
(मुरझाश माणेकशाना)
संचालक

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०६.०२.२०२१